अनिल मुळे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (दक्षता), महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(६) अंतर्गत प्रथम अपिलाचे कामकाज

माहितीचा
अधिकार

अपिल क्र ०३/२०१९
सुनावणी दिनांक १७/१०/२०१९
निर्णय दिनांक १७/१०/२०१९
जा.क्र. द/२४५१, दि. ०१/११/२०१९

विश्वमीना कंस्ट्रो
(श्री.नितेश विश्वास सूर्यवंशी)
स.नं.२५/१२, अंकिता अपार्टमेंट,
हिंगणे खुर्द, ता.हवेली, जि.पुणे. ........................ अपिलकर्ता

विरुद्ध

श्री. नितीन रामचंद्र देशपांडे
जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
दक्षता विभाग, महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका पुणे ४११ ००५. .................. प्रतिवादी

निकालपत्र

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत श्री.गौतम भालेराव यांनी दक्षता विभागाकडील ऑनलाईन पोर्टलवर रजि.नं.PUMCO/R/2019/60399 अन्वये दि.०८/०७/२०१९ रोजी अर्ज केला होता. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, दक्षता विभाग, पुणे महानगरपालिका यांनी अर्जदाराने विचारणा केलेल्या माहितीच्या अनुषंगाने माहिती द्यावी किंवा कसे याबाबतचे लेखी निवेदन दि.१६/०८/२०१९ अखेर उप आयुक्त (दक्षता) कार्यालयास सादर करणेबाबतची नोटीस मे. विश्वमीना कंस्ट्रो (श्री.नितेश विश्वास सूर्यवंशी) यांना जा.क्र.द/८५५, दि.०६/०८/२०१९ अन्वये दिली होती. अर्जदाराने मागितलेली माहिती उपलब्ध करून देऊ नये याबाबतचे लेखी निवेदन मे. विश्वमीना कंस्ट्रो (श्री.नितेश विश्वास सूर्यवंशी) यांनी उप आयुक्त (दक्षता) कार्यालय आ.क्र.१३९७, दि.१४/०८/२०१९ अन्वये सादर केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी कागदपत्रे देण्याबाबत उप आयुक्त (दक्षता) कार्यालय जा.क्र.द/१४३९, दि.०५/०९/२०१९ अन्वये निकालपत्र / निर्णय कळविला. सदरचा निर्णय कळविला असता मे. विश्वमीना कंस्ट्रो (श्री.नितेश विश्वास सूर्यवंशी) यांनी प्रथम अपील सादर केले आहे. (क्र. आरटीएस/अपिल/०३/२०१९ (उप आयुक्त (दक्षता) कार्यालय आ.क्र.२७९४, दि.०१/१०/२०१९) अन्वये प्राप्त)

अपिलार्थीस उप आयुक्त (दक्षता) विभाग जा.क्र.द/२३८९, दि.१५/१०/२०१९ च्या पत्रान्वये दि.१७/१०/२०१९ रोजी दुपारी ०३.०० वाजता सुनावणीस उपस्थित राहणेकरीता कळविण्यात आले होते. तसेच सुनावणीस उपस्थित राहणेसाठी अपिलार्थीस दि.१६/१०/२०१९ रोजी दूरध्वनी द्वारे देखील कळविण्यात आले होते.

१. अपिल दाखल तारीख ........................................................................ ०१/१०/२०१९

२. सुनावणी तारीख .............................................................................. १७/१०/२०१९

Scanned by CamScanner

३. अपिल निर्णय तारीख........................................................ १७/१०/२०१९

## विवेचन

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत श्री.गौतम भालेराव यांनी **"दि.०१/०१/२०१९ ते दि.३०/६/२०१९ या कालावधी मधील पुणे मनपाच्या ज्या ठेकेदारांची नोंदणी / बढती / नूतनीकरण झालेली आहेत त्यांचे काम पूर्ण केल्याचे दाखले, बँक स्टेटमेंट, वर्क ऑर्डर, चालू कामाचे वर्क ऑर्डर यांची प्रत मिळावी."** याबाबत मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, दक्षता विभाग, यांनी जावक क्र.द/८५५, दि.०६/०८/२०१९ अन्वये माहिती द्यावी किंवा कसे याबबाचे लेखी निवेदन दि.१६/०८/२०१९ पर्यंत या कार्यालयास सादर करणेस कळविले असता मे. विश्वमीना कंस्ट्रो (श्री.नितेश विश्वास सूर्यवंशी) यांनी दि.१४/०८/२०१९ रोजी अर्जदाराने मागितलेली माहिती उपलब्ध करून देऊ नये याबाबत पत्राने कळविले. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी उप आयुक्त (दक्षता) कार्यालय निकालपत्र / निर्णय कळविला असता सदरचा निर्णय मान्य नसल्याने मे. विश्वमीना कंस्ट्रो (श्री.नितेश विश्वास सूर्यवंशी) यांनी दि.०१/१०/२०१९ रोजी प्रथम अपील सादर केले. मे. विश्वमीना कंस्ट्रो (श्री.नितेश विश्वास सूर्यवंशी) यांना सुनावणीसाठी दि. १७/१०/२०१९ रोजी दुपारी ०३.०० वा. दक्षता विभाग, महापालिका आयुक्त कार्यालय, चौथा मजला, पुणे महानगरपालिका भवन, पुणे-०५. येथे उपस्थित राहून आपले म्हणणे मांडण्यासाठी संधी देण्यात आली.

सदर दिवशी व वेळी १. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.नितीन देशपांडे हे उपस्थित होते. अपिलकर्ता मे. विश्वमीना कंस्ट्रो (श्री.नितेश विश्वास सूर्यवंशी) हे सुनावणीस अनुपस्थित होते.

त्यावर जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.नितीन देशपांडे यांनी "उपलब्ध माहितीचे स्वरूप तसेच माहितीचे अधिकार अधिनियमातील कलम ८ च्या तरतुदी पाहता बँक स्टेटमेंट वगळून ठेकेदार नोंदणी करिता ऑनलाईन सादर केलेले काम पूर्ण केल्याचे दाखले, पूर्ण केलेल्या कामांची वर्क ऑर्डर व हातातील / चालू कामांचे वर्क ऑर्डर इ. अंशतः माहिती प्रकट करण्यात यावी, असा निर्णय घेतला आहे.

## निर्णय

जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.नितीन देशपांडे यांनी घेतलेला निर्णय योग्य असल्याने अपिल नामंजूर करण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
प्रथम अपिलीय अधिकारी
तथा उप आयुक्त (दक्षता)
महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका

Scanned by CamScanner